ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD**
**Malleshwaram, Bengaluru – 560 003**

# 2025–26 ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ – 1

# S.S.L.C. MODEL QUESTION PAPER - 1 : 2025 - 26

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

ವಿಷಯ ಸಂಕೇತ : **08-M** | **Subject Code : 08-M**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು ] | [ Time : 3 Hours 15 Minutes

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100** ] | [ Max. Marks : **100**

---

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.

2. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.

3. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

4. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

[ Turn over

**08-M**



**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.** **6x1=6**

1. 'सूर्योदय' या शब्दाचा संधिविग्रह असा होतो -

   (अ) सूर्य + उदय (ब) सूर्या + उदय

   (क) सुर्यो + दय (ड) सूर्य + दय

2. 'अष्टदिशा' हे या समासाचे उदाहरण आहे -

   (अ) अव्ययीभाव समास (ब) बहुव्रीही समास

   (क) कर्मधारय समास (ड) द्विगू समास

3. 'भीमक हा विदर्भ देशाचा राजा होता' या वाक्यातील काळ हा आहे -

   (अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ

   (क) भविष्यकाळ (ड) अपूर्ण वर्तमानकाळ

4. 'ज्याची अडचण त्यालाच माहीत' या अर्थाची म्हण ही आहे -

   (अ) चोराच्या मनात चांदणे (ब) खाई त्याला खवखवे

   (क) ज्यावे ज्याच्या वंशा, तेव्हा कळे (ड) अति तेथे माती

5. 'लेखक <u>दिल्लीत</u> रहात होते.' अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.

   (अ) प्रथमा विभक्ती (ब) तृतीया विभक्ती

   (क) पंचमी विभक्ती (ड) सप्तमी विभक्ती

6. 'आदुने गृहपाठ पूर्ण केला.' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

   (अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग

   (क) भावे प्रयोग (ड) यापैकी नाही

**II) पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा.**

**4 x 1 = 4**

7. शेती करणारा : शेतकरी : : गुरे राखणारा : ...........

8. ज्ञानी : अज्ञानी : : उत्तीर्ण : .............

9. परिणय : विवाह : : नृप : .............

10. हळूहळू : क्रियाविशेषण अव्यय : : किंवा : .............

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.** **7 x 1 = 7**

11. काकूंनी कोणता निर्वाणीचा संदेश दिला?

12. जपानी तरुण मुलींची चेष्टा केव्हा होते?

13. 'नोकर? छे, मालक !' या पाठाचे मूल्य कोणते?

14. कावळ्याने कोणता शकून सांगावा अशी कवीची इच्छा आहे?

15. संत ज्ञानेश्वरांनी कोणत्या ठिकाणी संजीवनी समाधी घेतली?

16. देशभक्त, समाजसेवकाला कशाची पर्वा नसते?

17. भर दुपारी कोणाची रांग लागते?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.** **3 x 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) उपरती होणे

    ब) बाळकडू मिळणे

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

    "खांद्यावरची रिकामी घागर प्रश्नांनी भरल्यासारखी वाटली."

20. गण पाडून वृत्त ओळखा.

    "पावेन पाय शिवही नमितो जयाते"

**V.** **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.** **7 x 2 = 14**

21. डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला?
22. विद्या संपादन करण्यासाठी आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले?
23. "छत्री, छप्पर मुर्दाबाद!" संदर्भासह स्पष्टीकरण करा.
24. रा.रं. बोराडे यांचा परिचय लिहा.
25. 'हं हळू बोला तनयाते' संदर्भासह स्पष्टीकरण करा.
26. इंद्रजित भालेराव यांचा परिचय लिहा.
27. भुके जीव काय करतील असे कवी म्हणतो?

**VI.** **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1 x 3 = 3**

28. अ) स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

**किंवा**

ब) थांबला तो संपला

**VII.** **खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा.** **10 x 3 = 30**

29. वसईचा किल्ला घेण्यासाठी चिमाजीअप्पांनी कोणकोणते प्रयत्न केले?
30. 'जपानी स्त्री' या पाठाच्या आधारे जपानी स्त्रीचे स्वभाववैशिष्टे लिहा.
31. शिबिरं घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत?
32. आपल्या मृत्युपत्रात महात्मा फुले यांनी काय लिहिले होते?
33. लेखक उत्तम कांबळे कोणते दिवास्वप्न पाहत असत?
34. आपणास श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मिणी त्याला कसे सांगते?
35. 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे?
36. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून शुक्र, धुमकेतू, मंगळ ग्रह कशाप्रकारे याचना करीत आहेत?
37. सैनिक, देशभक्त व समाजसेवक यांचे गुणगान का केले पाहिजेत?
38. 'धरण' कवितेच्या आधारे स्त्रियांच्या कष्टाचे वर्णन करा.

**VIII. खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा.** **4 x 4 = 16**

39. पिंपळ व जांभूळ या झाडाबद्दल लेखकाने कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत?

किंवा

जंगलातील पानगळीच्या दिवसात कोणते दृश्य दिसते? त्याचे वर्णन करा.

40. गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशा प्रकारे कष्ट घेतले?

किंवा

बेळगावी काँग्रेसच्या अधिवेशनातील घटनांचे वर्णन करा.

41. 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

नांदाते सुखे ......................................................

...........................................................................

...................................................... समुदाय प्रार्थना

किंवा

जातिभाव ......................................................

...........................................................................

...................................................... भीती बावरी.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.**

**1 x 4 = 4**

**(2+2)**

43. गीता ही गंगेपेक्षा महान आहे. गीता ज्ञानाचा समुद्र आहे. संसारी जनांना शांती व समाधान देणारा, पराक्रमाची ज्योत पेटवणारा, कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा असा हा ग्रंथ जगाच्या कोणत्याही वाङ्मयात नाही. जगप्रसिद्ध विद्वान डॉ.टॉयनबी म्हणतात, "मला तर जगातील एका सर्वोत्कृष्ट ग्रंथाची निवड करावयास सांगितली तर मी श्रीकृष्णाच्या गीतेचीच करीन." महात्मा थोरो म्हणतात, "जगात गीतेसारखा ग्रंथ झाला नाही. मी गीतेने मनाला रोज स्नान घालतो." गीतेत श्रीकृष्णाचा क्रांतिकारक विचार आहे. गीता हे आचरणाचे शास्त्र आहे. गीताधर्म हा मानवधर्म आहे.

प्रश्न :

अ) गीतेची थोरवी कशाप्रकारे वर्णन केली आहे?

ब) गीतेबद्दल विद्वानांनी कोणते गौरवोद्गार काढले आहेत?

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. 1 x 5 =5**

44. तुमच्या शाळेच्या शैक्षणिक सहलीला जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्र तुमच्या वडिलांना लिहा.

किंवा

शाळा सोडल्याचा दाखला मिळविण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधनलेखन करा.**

**1 x 5 = 5**

45. अ) संगणक साक्षरता काळाची गरज

ब) पोट नसते तर.. !

❑❑

Karnataka State Board

SSLC Examination

**Model Answers 2026**

08-M

**A**

**CCE RR/PR/PF**

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD,**
**MALLESHWARAM, BENGALURU – 560 003**

# SSLC MODEL QUESTION PAPER-1 2025-26

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** | **Code No. : 08-M**

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

**Subject : First Language — MARATHI**

(ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ )

**(Regular Repeater / Private Repeater / Private Fresh)**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 | [ **Max. Marks : 100**

| प्रश्न क्र. | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **I.**<br><br>01 | **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. 6x1=6**<br>'सूर्योदय' या शब्दाचा संधिविग्रह असा होतो – (सोपा)<br>(अ) सूर्य + उदय (ब) सूर्या + उदय<br>(क) सुर्यो + दय (ड) सूर्य + दय<br>**उत्तर : (अ) सूर्य + उदय** | 1 |
| 02 | 'अष्टदिशा' हे या समासाचे उदाहरण आहे - (सोपा)<br>(अ) अव्ययीभाव समास (ब) बहुव्रीही समास<br>(क) कर्मधारय समास (ड) द्विगू समास<br>**उत्तर : (ड) द्विगू समास** | 1 |
| 03 | 'भीमक हा विदर्भ देशाचा राजा होता' या वाक्यातील काळ हा आहे - (सोपा)<br>(अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ<br>(क) भविष्यकाळ (ड) अपूर्ण वर्तमानकाळ<br>**उत्तर : (ब) भूतकाळ** | 1 |
| 04 | 'ज्याची अडचण त्यालाच माहीत' या अर्थाची म्हण ही आहे - (सोपा)<br>(अ) चोराच्या मनात चांदणे (ब) खाई त्याला खवखवे<br>(क) ज्यावे ज्याच्या वंशा, तेव्हा कळे (ड) अति तेथे माती<br>**उत्तर : (क) ज्यावे ज्याच्या वंशा, तेव्हा कळे** | 1 |
| 05 | 'लेखक <u>दिल्लीत</u> रहात होते.' अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा. (सोपा)<br>(अ) प्रथमा विभक्ती (ब) तृतीया विभक्ती<br>(क) पंचमी विभक्ती (ड) सप्तमी विभक्ती<br>**उत्तर : (ड) सप्तमी विभक्ती** | 1 |
| 06 | 'आदुने गृहपाठ पूर्ण केला.' या वाक्यातील प्रयोग ओळखा. (सोपा)<br>(अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग<br>(क) भावे प्रयोग (ड) यापैकी नाही<br>**उत्तर : (ब) कर्मणी प्रयोग** | 1 |
| II<br><br>7. | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4**<br>शेती करणारा : शेतकरी : : गुरे राखणारा : ............ (साधारण)<br>**उत्तर : गुराखी** | 1 |
| 8. | ज्ञानी : अज्ञानी : : उत्तीर्ण : .............. (सोपा)<br>**उत्तर : अनुत्तीर्ण** | 1 |

| | | |
|---|---|---|
| 9. | परिणय : विवाह : : नृप : ............. (सोपा)<br>**उत्तर : राजा, भूपती, भूपाल इ.** | 1 |
| 10. | हळूहळू : क्रियाविशेषण अव्यय : : किंवा : ............. (साधारण)<br>**उत्तर : उभयान्वयी अव्यय** | 1 |
| **III**<br>11. | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7**<br>काकूंनी कोणता निर्वाणीचा संदेश दिला? (सोपा)<br>**उत्तर : कुत्र्याला तरी घालवून (हाकलून) द्यावे अथवा काकूंना तरी कायमची रजा द्यावी असा निर्वाणीचा संदेश दिला.** | 1 |
| 12 | जपानी तरुण मुलींची चेष्टा केव्हा होते? (सोपा)<br>**उत्तर : मुली नोकरी न करता घरातच बसून राहिल्या तर जपानी मुलींची चेष्टा होते.** | 1 |
| 13 | 'नोकर? छे, मालक !' या पाठाचे मूल्य कोणते? (सोपा)<br>**उत्तर : 'नोकर? छे, मालक!' या पाठाचे मूल्य 'स्वभावदोष', 'विनोदनिर्मिती' हे आहेत.** | 1 |
| 14 | कावळ्याने कोणता शकून सांगावा अशी कवीची इच्छा आहे? (साधारण)<br>**उत्तर : पंढरीचा राजा पांडुरंग पाहुणा म्हणून घरी केव्हा भेटायला येईल असा शकून सांगावा अशी कवीची इच्छा आहे.** | 1 |
| 15 | संत ज्ञानेश्वरांनी कोणत्या ठिकाणी संजीवनी समाधी घेतली? (सोपा)<br>**उत्तर : संत ज्ञानेश्वरांनी 'आळंदी' येथे संजीवन समाधी घेतली.** | 1 |
| 16 | देशभक्त, समाजसेवकाला कशाची पर्वा नसते? (साधारण)<br>**उत्तर : लोकसेवेत मग्न असणाऱ्यांना आपल्या जिवाची (देह राहील का जाईल) याची पर्वा नसते.** | 1 |
| 17 | भर दुपारी कोणाची रांग लागते? (सोपा)<br>**उत्तर : भर दुपारी डोक्यावरून पाणी वाहून नेणाऱ्या बायकांची रांग लागते.** | 1 |
| **IV**<br>18. | **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. 3 x 2 = 6**<br>खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (साधारण)<br>अ) उपरती होणे<br>**उत्तर : उपरती होणे - पश्चाताप होणे**<br>**वाक्यात उपयोग- राजाला स्वत:ची चूक लक्षात आल्यानंतर उपरती झाली.**<br>ब) बाळकडू मिळणे<br>**उत्तर : बाळकडू मिळणे - लहानपणी योग्य संस्कार मिळणे.**<br>**वाक्यात उपयोग-गंगूबाईंना घरातच संगीत शिक्षणाचे बाळकडू मिळाले होते.** | 2 |

| | | |
|---|---|---|
| 19. | अलंकार ओळखून लक्षणे लिहा : (साधारण)<br>"खांद्यावरची रिकामी घागर प्रश्नांनी भरल्यासारखी वाटली."<br>**उत्तर : उपमा अलंकार**<br>**लक्षणे- दोन वस्तूतील साम्य चमत्कृतिपूर्ण रितीने जेथे वर्तन केलेले असते तेथे उपमा अलंकार होतो. (या अलंकारात सारखा, सारखी, समान असे शब्द येतात.)** | 2 |
| 20. | गण पाडून व्रत्त ओळखा. (साधारण)<br>"पावेन पाय शिवही नमितो जयाते"<br>**उत्तर :** " पा वे न \| पा य शि \| व ही न \| मि तो ज \| या ते"<br>_ _ U \| _ U U \| U _ U \| U _ U \| _ _<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग<br>**वृत्ताचे नाव : वसंततीलका**<br>**लक्षणे :**<br>**अक्षरसंख्या : 14**<br>**गण : त, भ, ज, ज, ग ग**<br>**यती : 8 व्या अक्षरावर** | 2 |
| V<br>21. | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. 7 x 2 = 14**<br>**डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला? (सोपा)**<br>**उत्तर :** 'तुम्ही ज्याला हत्ती समजता तो हत्तीचा एक-एक अवयव आहे. तो हत्ती नव्हे. अशा सर्व अवयवांनी युक्त (जो आहे) तो हत्ती होय.' असे डोळस मनुष्य आंधळ्यांना म्हणाला. | 2 |
| 22. | **विद्या संपादन करण्यासाठी आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले? (सोपा)**<br>**उत्तर :** विद्या हे आंबेडकरांचे पहिले दैवत आहे. आंबेडकरांनी अपार वेदना आणि त्रास सोसून विद्या संपादन केली. मुंबईच्या डिपार्टमेंटच्या चाळीत दहा फूट लांब, दहा फूट रुंद अशा खोलीत आपल्या आई-वडील, भावंडे यांच्यासोबत राहून एक पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला. वेळप्रसंगी कन्या भाकरी खाल्ल्या. इंग्लंडमधील आठ वर्षांचा अभ्यासक्रम 21 तास अभ्यास करून 2 वर्षे 3 महिन्यात पूर्ण केला. | 2 |
| 23. | **"छत्री, छप्पर मुर्दाबाद!" संदर्भासह स्पष्टीकरण करा. (साधारण)**<br>**उत्तर : संदर्भ :** वरील संदर्भ 'मनाचे पिंजरे' या पाठातील असून या पाठाचे लेखक अनंत काणेकर हे आहेत.<br>**स्पष्टीकरण :** परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकल्याशिवाय मानवाची मुक्ती होऊ शकत नाही. त्याप्रमाणे या जागतिक क्रांतीचाही प्रारंभ मनाचे पिंजरे तोडून टाकण्यापासून व्हावा असे लेखकाला वाटते. मोठमोठी माणसे मोठमोठ्या क्रांत्या करत असतात. आपण मात्र छोट्या माणसांनी "छत्री, छप्पर मुर्दाबाद!" यापासून त्याची सुरुवात करावी. | 2 |

| | | |
|---|---|---|
| 24. | **रा.रं. बोराडे यांचा परिचय लिहा. (सोपा)**<br>**उत्तर :** पूर्ण नाव : रावसाहेब रंगराव बोराडे (1940) यांच्या कथा ग्रामीण जीवनावर आधारलेल्या आहेत. ग्रामीण जीवन, ग्रामीण व्यक्तिरेखा व त्यांच्या व्यथा यांचे सुरेख चित्रण त्यांच्या साहित्यातून आलेले आहे. ग्रामीण भाषेतील गोडवा, रांगडेपणा, सर्व लकबी, त्यांच्या लेखनातून दिसून येतात. 'माळराण', 'बोळवण', 'मळणी' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत. 'पाचोळा' या कादंबरीला व 'मळणी' या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्यनिर्मितीचा पुरस्कार मिळालेला आहे. | 2 |
| 25. | **'हं हळू बोला तनयाते' संदर्भासह स्पष्टीकरण करा. (साधारण)**<br>**उत्तर : संदर्भ :** वरील संदर्भ 'पाहुणे' या कवितेतील असून या कवितेचे कवी प्रल्हाद केशव अत्रे (केशवकुमार) हे आहेत.<br>**स्पष्टीकरण :** घरी आलेले पाहुणे मन मानेल तसे वागतात. अशा पाहुण्यांचे वर्तन पाहून बाळयाला आश्चर्य वाटते. तो आपल्या आईला हे पाहुणे कोठून आलेले आहेत याविषयी विचारतो. तेव्हा आपले बोलणे ओट्यावर झोपलेले पाहुणे ऐकतील म्हणून ती आपल्या बाळाला हळू बोलण्याची बोट वर करून सूचना करते. | 2 |
| 26. | **इंद्रजित भालेराव यांचा परिचय लिहा. (सोपा)**<br>**उत्तर :** इंद्रजित भालेराव (1962) यांची कविता संत तुकाराम आणि संत कबीरांचा वारसा घेऊन आलेली आहे. 'दूर राहिला गाव', 'जातं गाणं गातं' हे त्यांचे प्रसिद्ध कवितासंग्रह आहेत. 'आम्ही काबाडाचे धनी', 'कुळंबिणीची कहानी' या त्यांच्या दीर्घ कविता प्रसिद्ध आहेत. 'रानमळ्याची वाट', 'माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता' हे त्यांचे बाल- कवितासंग्रह आहेत. ग्रामीण जीवन व निसर्गाशी असलेले नाते हे त्यांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. लोकवाङ्मयाचा उपजत रेखीवपणा, मायबोलीचा थेट जिव्हाळा हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत. | 2 |
| 27. | **भुके जीव काय करतील असे कवी म्हणतो? (सोपा)**<br>**उत्तर :** भुके जीव विठ्ठलाकडे भाकरीच्या रुपाने पोटात येऊन भूक भागविण्याची विनंती करीत आहेत. विठ्ठलाने जर भूक भागविली नाही तर भुके जीव भूकेने व्याकूळ होऊन सैरावैरा धावतील. ते एकमेकांना खायला मागेपुढे पहाणार नाहीत. देवांना थेट इशारा देतील. वेळप्रसंगी देवाच्या माथ्यावर घणाचे घावही घालतील. देवरक्तही प्राशन करतील. कारण ते अन्नाचे भक्त आहेत. | 2 |
| **VI**<br><br>28. | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.**<br>**1 x 3 = 3**<br>**<u>अ) स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी (कठीण)</u>**<br>**उत्तर : I) कल्पनेचा अर्थ :** 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' या काव्यपंक्तीचा अर्थ असा आहे की, एखादा माणूस तीन्ही जगाचा स्वामी | 3 |

(राजा) असला तरी जर त्याच्याकडे आईसारखे मायेचे छत्र नसेल, आईचा आशीर्वाद नसेल तर तो भिकाऱ्यासारखा दुर्देवी आहे. यातून आपल्या आयुष्यातील आईचे महत्त्व अधोरेखित होते.

**II) उदाहरण व स्पष्टीकरण :** आईच्या प्रेमाची तुलना ही जगातील कोणत्याही गोष्टीशी होऊ शकत नाही. आपल्याजवळ खूप संपत्ती, सत्ता, कीर्ती, सर्वकाही आहे पण जर मायेची सावली देणारी आईच नसेल तर जीवनाच्या खऱ्या आनंदापासून आपण पारखे राहतो. ती केवळ जन्मदात्री नसून प्रेम, माया आणि त्याग यांचे प्रतीक आहे. आई आपल्या मुलासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करण्यासाठी तयार असते. आईच्या सान्निध्यात माणूस कितीही संकटात असला तरी सुरक्षित व आनंदीत असतो. जिजाऊ मातेने शिवबांना स्वराज्याची प्रेरणा दिली. महात्माजींच्या मनात सत्याचा आग्रह त्यांच्या मातेने ठसविला. तर भूदानाची कल्पना विनोबांना सूचली ती आईच्या शिकवणीतूनच. अशी आईची महती आहे.

**III) तात्पर्य :** एकूणच आईशिवाय जीवनाचा आनंद अपूर्ण आहे. म्हणून वरील काव्यपंक्तीतून आईचे आपल्या जीवनातील महत्त्व अधोरेखित होते.

**किंवा**

**ब) <u>थांबला तो संपला (कठीण)</u>**

**उत्तर : I) कल्पनेचा अर्थ :** 'थांबला तो संपला' या सुवचनाचा अर्थ असा आहे की, आपण एखादे ध्येय गाठण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत. जर आपण प्रयत्न थांबविले तर आपली प्रगती थांबते व आपण आपल्या ध्येयापासून दूर जातो. म्हणून जीवनात यशस्वी होण्यासाठी सतत प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे.

**II) उदाहरण व स्पष्टीकरण :** गतिशीलता हे मानवी जीवनाचे खरे लक्षण आहे. जसा पाण्याचा प्रवाह कधी थांबत नाही. आपल्या मार्गात येणाऱ्या अडथळयांना ओलांडून, वळसा घालून तो निरंतर पुढे जात असतो. मानवी जीवन हे पाण्याप्रमाणेच प्रवाही असावे. पाणी एकाच ठिकाणी साचून राहिले तर त्याचे डबके होते, त्याला दुर्गंधी येते. परंतु ते वाहत राहिले तर शेवटी सागराला जाऊन मिळते. त्या प्रवाहाला दिव्यत्व प्राप्त होते. मानवी जीवनाचे असेच आहे. सतत केलेल्या प्रयत्नांमुळे जीवनात प्रगती होते. जर संकटांना घाबरुन प्रयत्न करण्याचे सोडून दिले तर कधीच यश मिळत नाही. म्हणून व्यक्तीने व समाजाने नेहमी गतीशील असले पाहिजे.

**III) तात्पर्य :** आपल्या जीवनात प्रगती साधण्यासाठी, एखादे ध्येय गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे महत्त्वाचे आहे.

| | | |
|---|---|---|
| VII | **खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा.** **10 x 3 = 30** | |
| 29. | **वसईचा किल्ला घेण्यासाठी चिमाजीअप्पांनी कोणकोणते प्रयत्न केले? (साधारण)**<br>**उत्तर :** चिमाजीअप्पांनी कोकणातील बराच मुलूख जिंकून पुढील प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन करण्यासाठी वसईपर्यंत गेले. वसई किल्ल्यावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. हा किल्ला समुद्रात होता. केवळ एकाच बाजूने जमीन होती. तेव्हा किल्ला घेण्यासाठी प्रथम आरमारांच्या सहाय्याने लढाई केली गेली. तीन वर्षे लढूनदेखील यश मिळाले नाही. पण किल्ला घेण्याचा निर्धार पक्का होता. किल्ल्यातील भेद जाणण्यासाठी सरदारांनी वेगळा वेष परिधान करून गुप्त माहिती मिळविली. शेवटी तहाद्वारे चिमाजीअप्पांनी किल्ला ताब्यात घेतला. | 3 |
| 30. | **'जपानी स्त्री' या पाठाच्या आधारे जपानी स्त्रीचे स्वभाववैशिष्टे लिहा. (साधारण)**<br>**उत्तर :** 'जपानी स्त्री' या पाठात लेखिका इंदू साक्रीकर यांनी जपानी स्त्रीच्या अनेक स्वभावगुणांचे वर्णन केले आहे. जपानी स्त्री रुपाने जशी गोड आहे तशी स्वभावाने प्रेमळ व विनम्र आहे. पाहुण्यांचे स्वागत खूप मनोभावे करतात. त्या खूप मेहनती आहेत. हॉटेलातील वाढपी, बूटपॉलिश करणे, केस कापणे, कागदी डबे विकणे अशा हलक्या स्वरूपाची कामे देखील त्या न लाजता निर्भयपणे करतात. स्वत:च्या लग्नासाठी पैसा जमा करतात. घरात सर्व प्रकारच्या सुविधा असाव्यात असा त्यांचा हट्ट असतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात त्या पुढारलेल्या आहेत. स्त्रियांनी स्वत: पुढाकार घेऊन अनेक संस्था स्थापन करून स्वावलंबी जीवन जगत आहेत. थोडक्यात जपानी स्त्री सोज्वळ, विनम्र व निर्भय आहे. | 3 |
| 31. | **शिबिरं घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत? (साधारण)**<br>**उत्तर :** डॉ.रवींद्र कोल्हे यांनी आदिवासी तरुण मुलांसाठी शिबिरे आयोजित केली; पण या शिबिरात येणारे शिक्षक हे बाहेरगावाहून आलेले असल्यामुळे आदिवासी वातावरण व परिस्थितीशी जुळवून घेताना त्यांची चिडचीड होत होती. पिढ्यानपिढ्यांपासून अक्षरज्ञान नसलेल्या आदिवासींच्या मुलांना शिकविण्याचा कळवळा त्यांच्यापाशी नव्हता. त्यामुळे 'यह आदिवासी कभी नहीं बदलेगा' असा त्यांचा समज झाला होता म्हणून ते नाखूष असत. | 3 |

| | | |
|---|---|---|
| 32. | **आपल्या मृत्युपत्रात महात्मा फुले यांनी काय लिहिले होते? (सोपा)**<br>**उत्तर :** आजपर्यंत आपण केलेले कार्य आपल्या मृत्यूनंतरही चालावे याकरिता महात्मा फुले यांनी आपले मृत्यूपत्र लिहिलेले होते. आपल्या पश्चात आपला वारस यशवंतच असेल असे त्यांनी नमूद केले होते. आपल्याप्रमाणेच यशवंताने शुद्र, अतिशूद्रांना मानवद्रोही ब्राह्मणांच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी आयुष्य खर्च करावे व उभयंतांच्या मृत्यूनंतर सर्व विधी सत्यशोधक पद्धतीने कराव्यात असे मृत्यूपत्रात लिहून ठेवलेल्या होत्या. | 3 |
| 33. | **लेखक उत्तम कांबळे कोणते दिवास्वप्न पाहत असत? (साधारण)**<br>**उत्तर :** मला चांगली नोकरी लागेल. मी आक्काला इतकं भारी लुगडं घेईन की सारे बघत राहतील. मी अण्णाला चाकरीतून मुक्त करेन. मी आक्काला माझ्याकडेच ठेवेन. तिला कसलाही त्रास होऊ देणार नाही. मी स्वत:साठी घर बांधेन, खूप कष्ट करेन. स्वप्नांच्या या मालिकेत डोळ्यांसमोर त्यांची आक्का भारी किंमतीच्या नऊवारी लुगड्यात दिसायची. तिचा चेहरा हसरा वाटायचा. तिच्या चेहऱ्यावर उगवणारं चिंतेचं जंगल संपलेलं दिसायचं अशा प्रकारे लेखक उत्तम कांबळे दिवास्वप्न पाहत असत. | 3 |
| 34. | **आपणास श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मिणी त्याला कसे सांगते? (साधारण)**<br>**उत्तर :** श्रीकृष्णाचे सद्गुण ऐकल्यानंतर रुक्मिणीने मनोमन श्रीकृष्णाला आपला पती म्हणून स्वीकारते. तेव्हा शिशूपालरुपी कोल्ह्यापासून पत्नीचे रक्षण करणे हे पती म्हणून तुझे कर्तव्य आहे असे ती सांगते. कारण शिशूपालरुपी कोल्हा धाड घालून पळवून न्यावे हे तुझ्यासारख्या वीराला आवडणार नाही. तू स्वत:च्या पराक्रमाने सर्वांना पराजित करून आपणास घेऊन जावे. या शब्दात श्रीकृष्णाला मनाने वरल्याचे रुक्मिणी सांगते. | 3 |
| 35. | **'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे? (कठीण)**<br>**उत्तर :** कवी राम जोशी यांनी 'भला जन्म हा' या लावणीतून (कवितेतून) भक्तीच्या ढोंगीपणावर आसूड ओढले आहेत. ढोंगी साधू स्वत:लाच देवाचा अवतार समजून लोकांना फसवितात. अशा ढोंगी साधूंना उद्देशून ते म्हणतात की, तुला दुर्लभ असा मानवजन्म मिळालेला आहे. ही त्या परमेश्वराची कृपा समज आणि परमेश्वराला शुद्ध अंत:करणाने शरण जा, त्याची सेवा कर. चराचरावर ज्याची सत्ता आहे असा तो परमेश्वर तुला या भवसागरातून तारुण नेणार आहे याची | 3 |

| | | |
|---|---|---|
| | थोडी जाणीव ठेव असे कवी म्हणतो आहे. | |
| 36. | **पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून शुक्र, धुमकेतू, मंगळ ग्रह कशाप्रकारे याचना करीत आहेत? (साधारण)**<br>**उत्तर :** 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत पृथ्वीचे प्रेम मिळविण्यासाठी आकाशातील शुक्र, धुमकेतू, मंगळ असे अनेक ग्रह विविध प्रकारे तिच्याकडे प्रेमयाचना करीत आहेत अशी भव्य कल्पना कवीने केली आहे. **शुक्र** हा भल्या पहाटे पृथ्वीची वाट पाहत दरवाजात उभा आहे व आपल्या प्रभेचा पिसारा फुलवून पृथ्वीकडे प्रेमयाचना करीत आहे. **धुमकेतू** पिसाटाप्रमाणे (वेड्यासारखा) स्वत:चे केस पिंजारून पृथ्वीकडे प्रेमयाचना करीत आहे. **मंगळ** हा ग्रह पृथ्वीकडे प्रेमयाचना करताना लाजून लाल झालेला आहे. | 3 |
| 37. | **सैनिक, देशभक्त व समाजसेवक यांचे गुणगान का केले पाहिजेत? (साधारण)**<br>**उत्तर :** 'गाऊ त्यांना आरती' या कवितेत कवी यशवंत यांनी सैनिक, समाजसेवक, देशभक्त व संत यांचे गुणगाण केले आहे. **सैनिक** देशावर येणाऱ्या संकटाच्या प्रसंगी राष्ट्राच्या रक्षणासाठी धैर्याने शत्रूशी लढतात व कर्णासारखे रणांगणावर देशासाठी बलिदान देतात म्हणून त्यांचा गौरव केला पाहिजे. त्याचप्रमाणे **देशभक्त** देखील स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवून देशासाठी आपले जीवन समर्पित करतात. देश हाच देव समजून त्याची मनोभावे सेवा करतात. देशाला गुलामीतून मुक्त करणे हेच त्याचे एकमेव ध्येय असते. शेवटी मार्कंडेय ऋषीप्रमाणे अमरत्व प्राप्त करतात म्हणून त्यांचा गौरव करावा. **समाजसेवक** हे समाजाच्या उन्नतीसाठी आपल्या देहाची पर्वा न करता कार्य करतात. लोकांच्या सुखी जीवनासाठी सौभद्रासारखे आत्माहुती देतात म्हणून त्यांचा गौरव केला पाहिजे. | 3 |
| 38. | **'धरण' कवितेच्या आधारे स्त्रियांच्या कष्टाचे वर्णन करा. (साधारण)**<br>**उत्तर :** 'धरण' या कवितेत दया पवार यांनी कष्ट करुनही उपाशी राहणाऱ्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या वेदना मांडल्या आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांना भल्या पहाटे उठून झाडलोट, दळणकांडण, स्वयंपाकपाणी यासारखी कामे करावी लागतात. घरातील कामे आटोपल्यानंतर त्यांना शेतीच्या किंवा रोजंदारीच्या कामावर जावे लागते. तहाने लेकरु असले तरी त्याला झाडाखाली किंवा वेताच्या पाठीखाली झोपवून काम करावे लागते. एवढे काबाडकष्ट करून देखील पायाला साधी चप्पल मिळत नाही म्हणून वेळप्रसंगी पायाला झाडाचा पाला बांधून काम करावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. एवढे कष्ट करूनही त्यांच्या जीवनात सुखाचे | 3 |

| | | |
|---|---|---|
| | क्षण लाभत नाहीत पण त्या आशावादी आहेत. | |
| **VIII**<br>39. | **खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा. 4 x 4 = 16**<br>**पिंपळ व जांभूळ या झाडाबद्दल लेखकाने कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत? (साधारण)**<br>**उत्तर :** लेखक गुलजार यांना झाडे खूप प्रिय आहेत. **पिंपळ** हा पुरातन वृक्ष असून पूर्वजांनी त्याला देवाचे रूप दिले आहे. पिंपळाचे प्रत्येक अवयव औषधीच्या रुपात मानवाला उपयोग पडतात. पिंपळाबद्दल आठवणी सांगताना लेखक लिहितात, लहानपणी मित्रांसोबत पिंपळाची पाने गोळा करून 'ले मलाई बर्फ, ले मलाई बर्फ' असं ओरडत खोटा-खोटा कुल्फीवाला बनून खेळ खेळत असत. पिंपळाच्या पानांना खोटा-खोटा कात चुन्ना लावून खेळातले विडे तयार करणे, पानाचे दुकान चालवणे हाही खेळ खेळत असत. **जांभूळ** या झाडाला लेखक लहानपणीचा गारवा म्हणतात. कारण लेखक जांभळाच्या सान्निध्यात खेळत-खेळतच लहानाचे मोठे झाले. जांभळाचे झाड एखाद्या वयस्कर व्यक्तीप्रमाणे त्यांना वाटते. उन्हाळ्यात भर दुपारी जांभळाच्या झाडाखाली खेळण्यास घरातून परवानगी मिळत असे. त्या झाडाजवळ खेळताना जणू आजोबाजवळ खेळतोय असे त्यांना वाटत असे. दोन्ही हात पसरून जणू ते आशीर्वाद देत आहेत असा भास लेखकाला होत असे.<br>**किंवा**<br>**जंगलातील पानगळीच्या दिवसात कोणते दृश्य दिसते? त्याचे वर्णन करा. (साधारण)**<br>**उत्तर :** पानगळीच्या मोसमात जंगलातील झाडांची पाने गळतात. झाडे आपला हिरवा रंग टाकून, लाल पिवळ्या, केशरी रंगाची उधळण करतात. ते पाहताना आपले भान हरपून जाते. बहावा लाल व चिनार वृक्षमंडळी आपल्या पहाडी भागात अशी काही रंगांची दाटी करतात की रंगीबेरंगी कपडे घालून कुठलीतरी वरात चालली आहे असा लेखकाला भास होतो. पानगळीच्या मोसमात जंगलातील झाडे सौंदर्याची उधळण करतात. | 4 |
| 40. | **गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशा प्रकारे कष्ट घेतले? (साधारण)**<br>**उत्तर :** गंगूबाई हनगल यांना संगीत शिक्षणाचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांची आई अंबाबाई यांनी गंगूबाईवर संगिताचा पहिला संस्कार केला. लहानपणापासून त्यांना गायनाची आवड होती. अब्दुल करीम खाँ, द.रा. बेंद्रे गुरुजी यांनीही वेळोवेळी त्यांना संगीत शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. शालेय शिक्षणानंतर हुबळीला कृष्णाचार्य हुलगूर आणि कुंदगुळ येथे सवई गंधर्व यांच्याकडून | 4 |

| | | |
|---|---|---|
| | संगीताचे धडे घेतले. त्यांचा आवाज अतिशय नाजूक, पातळ व बारीक असल्याकारणाने त्या गाऊ लागल्या की त्यांचा गळा दुखत असायचा. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना गळयावर शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. त्याचा परिणाम त्यांचा आवाज पुरुषी झाला पण त्यांनी गाणे न थांबविता पुन्हा रियाज करून आपला आवाज पूर्ववत प्राप्त केला. पहाटे उठून दोन-दोन तास खर्जाचा रियाज करत असत. अशा प्रकारे त्यांनी संगीत शिक्षणासाठी वेगवेगळे कष्ट घेतले.<br>**किंवा**<br>**बेळगावी काँग्रेसच्या अधिवेशनातील घटनांचे वर्णन करा. (साधारण)**<br>**उत्तर :** 1942 साली बेळगाव येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष महात्मा गांधी होते. या कार्यक्रमाचे स्वागतगीत गाण्याचा मान गंगूबाई व त्यांच्या शाळेतील इतर विद्यार्थ्यांना मिळालेला होता. त्यावेळी त्यांचे वय अवघे 11 वर्ष होते. स्वागतगीत शिकविण्यासाठी म्हैसूरहून शिक्षक आणले होते. व्यासपीठावर महात्मा गांधी, पंडित नेहरू, गंगाधर देशपांडे, महंमद अली जीना यासारखी बडी मंडळी बसली होती. गंगूबाईंचे गाणे इतके उत्तम झाले की, प्रत्यक्ष गांधीजींनी त्यांना शाबासकी दिली. आपल्या जातीवरुन आपला अपमान होईल अशी सारखी भीती त्यांना वाटत होती पण तसे काही घडले नाही. ही घटना दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात राहिली. | |
| 41. | **'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा. (कठीण)**<br>**उत्तर :** 'सत्कार' या कवितेत कवी मंगेश पाडगावकरांनी पहिल्या हिरव्या तृणपात्याच्या सत्काराचे वर्णन केले आहे. सुरुवातीला धरणीने आपल्या उरावर ज्वालारसाचे चटके सहन करून कठीण असे तप केले. उगवण्याची परिस्थिती नसतानादेखील हे तृणपाते मातीशी लढा देत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत उगवते. धरणीच्या पोटामध्ये असलेल्या छोट्याशा बीजातून हे तृणपाते भूमीचे कठीण कवच फोडून वर येते. म्हणून त्याचा सत्कार करण्यात आला. हे तृणपाते म्हणजे विजयाचा ध्वज आहे. परमेश्वराचा साक्षात्कार आहे असे कवीला वाटते. या तृणपात्याच्या सत्कारासाठी पक्षांनी स्वागतगीत म्हटले, ढगांनी लवून मुजरा केला, वाऱ्याने लाल मातीरुपी गुलाल उधळला, दक्षिणोत्तर पावसाच्या सरी कोसळल्या, मातीतून मृदगंध उधळला, अष्ट दिशातून जयजयकार झाला अशा प्रकारे तृणपात्याचा सत्कार करण्यात आला. | 4 |

| | | | |
|---|---|---|---|
| 42. | **खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. (सोपा)**<br>नांदाते सुखे ..........................................................<br>...................................................... समुदाय प्रार्थना<br>**उत्तर :** नांदोत सुखे गरीब अमीर एक मतानी<br>मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी<br>स्वातंत्र्य सुखा या सकलामाजी वसू दे, दे वरचि असा दे\|\|1\|\|<br>सकलास कळो मानवता राष्ट्रभावना<br>हो सर्वस्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना<br>**किंवा**<br>जातिभाव ........................................................<br>..............................................................................<br>...................................................... भीती बावरी.<br>**उत्तर :** जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही<br>अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातून<br>खलनिंदका मनीही सत्य, न्याय वसू दे, दे वरचि असा दे\|\|1\|\|<br>सौंदर्य रमो घराघरात स्वर्गियापरी<br>हो नष्ट होऊ दे विपत्ती, भीती बावरी | 4 |
| **IX**<br><br><br>43. | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1 x 4 = 4**<br>**(2+2)**<br>गीता ही गंगेपेक्षा महान आहे. गीता ज्ञानाचा समुद्र आहे. संसारी जनांना शांती व समाधान देणारा, पराक्रमाची ज्योत पेटवणारा, कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा असा हा ग्रंथ जगाच्या कोणत्याही वाङ्मयात नाही. जगप्रसिद्ध विद्वान डॉ.टॉयनबी म्हणतात, "मला तर जगातील एका सर्वोत्कृष्ट ग्रंथाची निवड करावयास सांगितली तर मी श्रीकृष्णाच्या गीतेचीच करीन." महात्मा थोरो म्हणतात, "जगात गीतेसारखा ग्रंथ झाला नाही. मी गीतेने मनाला रोज स्नान घालतो." गीतेत श्रीकृष्णाचा क्रांतिकारक विचार आहे. गीता हे आचरणाचे शास्त्र आहे. गीताधर्म हा मानवधर्म आहे.<br>प्रश्न :<br>**अ) गीतेची थोरवी कशाप्रकारे वर्णन केली आहे? (साधारण)**<br>**उत्तर :** 'गीता हा ग्रंथ गंगा नदीपेक्षा महान असून तो साक्षात ज्ञानाचा सागर आहे.' संसारी जीवन जगणाऱ्या लोकांना हा ग्रंथ व्यावहारिक व आध्यात्मिक ज्ञानाच्या दृष्टीने खूप उपयुक्त आहे. गीतेतील ज्ञानामुळे मानवाला शांती व समाधान लाभते. प्रत्येकाच्या अंत:करणात पराक्रमाची ज्योत पेटविणारी हा पवित्र ग्रंथ आहे. कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा यासारखा श्रेष्ठ ग्रंथ जगाच्या इतर कोणत्याही वाङ्मयात | 4 |

| | | |
|---|---|---|
| | शोधूनही सापडणार नाही. अशाप्रकारे गीतेची थोरवी वर्णन केली आहे.<br>**ब) गीतेबद्दल विद्वानांनी कोणते गौरवोद्गार काढले आहेत? (साधारण)**<br>**उत्तर :** 'गीता' हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ असून त्याची थोरवी जगातील अनेक विद्वानांनी आपापल्या शब्दात वर्णन केलेली आहे. जगप्रसिद्ध विद्वान डॉ.टॉयनबी यांनी गीता या ग्रंथाबद्दल म्हटले आहे की, "मला जर जगातील एका सर्वोत्कृष्ट ग्रंथाची निवड करावयास सांगितले तर मी श्रीकृष्णाच्या गीतेचीच करीन." त्याचप्रमाणे महात्मा थोरो म्हणतात की, "जगात गीतेसारखा ग्रंथ झाला नाही. मी गीतेने मनाला रोज स्नान घालतो." विद्वानांच्या वरील उद्गारावरुन गीता या ग्रंथाचे श्रेष्ठत्व लक्षात येते. | |
| **X**<br><br>44. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.**<br>**1 x 5 =5**<br>**तुमच्या शाळेच्या शैक्षणिक सहलीला जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्र तुमच्या वडिलांना लिहा. (कठीण)**<br>अ. ब. क.,<br>नेताजी वसतिगृह,<br>आदर्श विद्यालय,<br>बिदर-585401<br>दिनांक : 01.01.2025<br>तीर्थरूप बाबांना,<br>सा.न.वि.वि.<br>बाबा कालच तुमचे पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. तुम्ही सर्वजण मजेत असाल अशी आशा करतो. पत्र लिहिण्यास कारण की, माझ्या शाळेची सहल जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात म्हैसूर, बेंगळुरू याठिकाणी जाणार आहे. माझे सर्व वर्गमित्र सहलीला जाणार आहेत. मलाही सहलीला जाण्याची खूप इच्छा आहे. पाच दिवसांच्या सहलीसाठी प्रवास, भोजन, निवास असे सर्व मिळून 2000 रुपये खर्च येणार आहे. तुमची व आईची परवानगी असेल तरच मी सहलीला जाईन. तुमची परवानगी असेल तर पालकांचे संमतीपत्र आवश्यक आहे. त्यामुळे आपले संमतीपत्र व लागणारी 2000 रुपये रक्कम लवकर पाठवून दिल्यास मला सहलीत सहभागी होता येईल. माझ्या अभ्यासाची काळजी नसावी.<br>तीर्थस्वरूप आईला माझा साष्टांग नमस्कार.<br>तुमचा लाडका मुलगा,<br>अ. ब. क. | 5 |

<table>
<tr><td></td><td>पत्ता :<br>श्री.व्ही.एन. बिरादार,<br>मु.पो.मुदखेड,<br>ता.कमलनगर,<br>जि.बिदर-585417<br>किंवा<br>शाळा सोडल्याचा दाखला मिळविण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा. (कठीण)<br>अ. ब. क.,<br>मुर्की.<br>दिनांक : 01/01/2025<br>प्रति,<br>मा.मुख्याध्यापक साहेब,<br>सरस्वती विद्यालय,<br>बिदर.<br>विषय :- शाळा सोडल्याचा दाखला मिळणे बाबत.<br>महोदय,<br>वरील विषयास अनुसरून मी अ. ब. क., आपणास विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो की, मी आपल्या शाळेचा विद्यार्थी असून सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 10 वी वर्गात शिकत होतो. मार्च 2025 मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेत मी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेलो आहे. पुढील शिक्षण घेण्याचा माझा मनोदय आहे. पुढील वर्गात प्रवेश घेण्यासाठी मला माझा शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक आहे.<br>तरी कृपाळू मुख्याध्यापक साहेबांनी दाखला देऊन सहकार्य करावे ही नम्र विनंती.<br>कळावे,<br>आपला आज्ञाधारक विद्यार्थी,<br><br>अ. ब. क.</td><td></td></tr>
<tr><td>XI<br>45.</td><td>खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा. 1 x 5 = 5<br><u>अ) संगणक साक्षरता काळाची गरज (कठीण)</u><br>उत्तर : आजच्या डिजिटल युगात 'संगणक' हा परवलीचा शब्द बनला आहे. तो आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. पूर्वी संगणक फक्त मोठमोठ्या कंपन्यांमध्ये दिसत होता. पण आता तो प्रत्येक घरात, शाळेत, दुकानात आणि कार्यालयात पोहोचला आहे.</td><td>5</td></tr>
</table>

या पार्श्वभूमीवर संगणक साक्षरता ही एक आता काळाची अत्यावश्यक गरज बनली आहे. आज आपण ज्या युगात जगत आहोत त्याला 'डिजिटल युग' किंवा माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हटले जाते. संगणक हातात तर जग आपल्या मुठीत! यावरुन संगणकाचे आजच्या युगातील महत्त्व लक्षात येते. या युगात टिकून राहण्यासाठी व आपली प्रगती करण्यासाठी संगणकाचे मूलभूत ज्ञान असणे अनिवार्य झाले आहे. सरकारी कार्यालयापासून ते खासगी बँकांपर्यंत सर्वच कामकाज संगणकीकृत झाले आहे. आपले जन्म प्रमाणपत्र काढणे, वीज बिल भरणे, विमान, रेल्वे प्रवासाचे तिकीट काढणे इत्यादी सर्व कामे आता संगणकाच्या मदतीने केली जात आहेत. त्या व्यक्तीला संगणक हाताळता येत नाही त्याला अनेक कामांसाठी आपली शक्ती व वेळ खर्च करावा लागतो. संगणकाचे ज्ञान असेल तर तो घरी बसल्या बसल्या सर्व प्रकारची कामे सहजरित्या करू शकतो.

शिक्षण क्षेत्रातही संगणकाने क्रांती घडवून आणली आहे. ई-लर्निंग, ऑनलाईन क्लासेस व संशोधन या कार्यासाठी संगणक व इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. आपल्या करिअरच्या दृष्टीने संगणकाच्या ज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संगणक साक्षरता म्हणजे उज्ज्वल भविष्याची दक्षता. प्रत्येक क्षेत्रात नोकरीसाठी उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले आहे. संगणकीय ज्ञानाच्या बाबतीत निरक्षर असल्यास नोकरीच्या अनेक संधी गमवाव्या लागतील. आज अनेक परीक्षा संगणकाच्या माध्यमातून घेतल्या जात आहेत. आज लहानमोठ्या व्यावसायांसाठी संगणक खूप फायदेशीर ठरत आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करणे, हिशोब ठेवणे, दैनंदिन बिल काढणे या गोष्टी संगणकाने सहजशक्य होतात. केवळ इंग्रजी भाषेपुरतेच नाही तर मराठी, कन्नडसह इतर अनेक भारतीय भाषांमध्ये संगणक वापरणे हे सहज शक्य झाले आहे.

'डिजिटल इंडिया'चे स्वप्न साकार करण्यासाठी आणि देशातील प्रत्येक नागरिकाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संगणक साक्षरता ही काळाची गरज बनली आहे हे निर्विवाद सत्य आहे. थोडक्यात, आपल्या दैनंदिन जीवनात संगणक आपल्याला उपयोगी पडत असल्याने प्रत्येकाने संगणकाचे शिक्षण घेणे आवश्यक आहे. नव्हे तर ती काळाची गरज आहे. म्हणूनच संगणक साक्षरता आधुनिक जीवनाचा पाया आहे असे म्हटले जाते. थोडक्यात, संगणक शिकूया, डिजिटल युगात पुढे जाऊया.

**किंवा**

| | | |
|---|---|---|
| | **ब) पोट नसते तर.. ! (कठीण)**<br>**उत्तर :** पोट नसते तर आयुष्य किती सोपे झाले असते, नाही का? 'पोट' हा दोन अक्षरी शब्द संपूर्ण जग व्यापून उरला आहे. जसा देव अनादी आहे तसेच पोट देखील अनादी काळापासून माणसांची, प्राण्यांची सोबत करीत आहे. अशा या लहानशा पोटाने महाकाय असे प्रश्न या जगात निर्माण केले आहेत. मी कल्पना करतो की, पोट नसते तर... जग खूप सरळ साधे आणि समस्याविरहित झाले असते.<br>पृथ्वीतलावरील प्रत्येक प्राण्याला आपले पोट भरण्यासाठी, अन्न मिळविण्यासाठी सतत प्रयत्न करावे लागतात. पोट वीतभर असले तरी आजपर्यंत कोणालाही पूर्णपणे भरता आलेले नाही. 'वीतभर पोटाची खळगी' अशा शब्दात आपण त्याची संभावना करतो. 'आधी पोटोबा मग विठोबा' अशी म्हणही समाज जीवनात प्रचलित आहे. म्हणूनच म्हणतात, 'अन्नासाठी दाही दिशा, आम्हा फिरविती जगदिशा' पोट नसते तर माणसाने कोणतीही धडपड केली नसती. शेती पिकवावी लागली नसती. धान्य निर्माण करायची गरज नसती. त्यामुळे शेती व शेतीवर आधारित सर्व उद्योगधंदे यांची गरजच नसती. घरातील स्त्रियांना स्वयंपाक करणे, भांडी घासणे यासारख्या कटकटींची कामे करावीच लागली नसती. खानावळी राहिल्या नसत्या. घरातील माणसे एकमेकांच्या हुकमतीत राहिली नसती. घरात, समाजात एक प्रकारचा गोंधळ माजला असता. सगळीकडे आळसाचे साम्राज्य माजले असते. त्यामुळे जग सुरळीत चालण्याचे श्रेय या पोटालाच द्यावे लागते.<br>मानवी संस्कृतीमध्ये जीवन हे केवळ उदरभरण नसून ते सामाजिकदृष्ट्या एकत्र येण्याचा, नातेसंबंध दृढ करण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे पोट नसते तर लग्नाच्या पंगती, दिवाळीचा फराळ, मित्रांसोबत जेवणाचा एकत्रितपणे घ्यावयाचा आनंद, अनेक खाद्यपदार्थांची चव या सर्वांना आपल्याला मुकावे लागले असते. पोट नसते तर आरोग्याच्या अनेक समस्याही राहिल्या नसत्या. पण पोटाचे अस्तित्व हे केवळ शारीरिक गरज नसून ती मानवी जीवनशैली, संस्कृती आणि अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. पोट भरण्यासाठी मानवाला संघर्ष करावा लागतो. त्यामुळे चांगल्या आणि वाईट घडामोडीही घडतात. पोट नसेल तर जगण्याची मानवाची मूलभूत प्रेरणाच नाहीशी होईल. म्हणून जीवनाचा हा गाडा सुरळीत चालविण्याचे श्रेय पोटालाच जाते. शेवटी मला म्हणावेसे वाटते की, पोटा थोर तुझे उपकार ...! | |